नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 07/06/2021 (सोमवार)
(सायंकाळ)

---

### जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 14 कि.मी अंतरावर मौजा नागपुर तें अमरावती हायवे रोड हिंगणा टी पॉईट धनुपार ढोले यांचे हॉटेल समोर येथे दिनांक 07/06/2021 रोजी 03.00 वा. दरम्यान जखमी/फिर्यादी नामे– ऋतुराज राजकुमार सोनवाने, वय 46 वर्ष, रा. टी.सी.आय पेट्रोल पंप जवळ वडधामना ता.जि.नागपुर पो.स्टे वाडी नागपुर (शहर) याला आरोपी नामे– सुनिल वेडे(ट्रक गाईड), रा. वडधामना ता.जि.नागपुर पो.स्टे वाडी नागपुर (शहर) याने म्हटले की, "तु येथे ट्रक का थांबवितो" असे म्हणुन झगडा भांडण करून शिवीगाळ केली. यानंतर आरोपीने फिर्यादीला ढकलुन जमीनीवर पाडले व जमीनीवरचा मोठा दगड दोन्ही हातानें उचलुन "तुला आज जिवाने मारून टाकतो" असे म्हणुन जिवाने मारण्याचे उद्देशाने तो दगड फिर्यादीचे डोक्यावर मारल्याने तो दगड फिर्यादीचे उजवे कानाजवळ मारून गंभीर जखमी केले व फिर्यादी हे आपला जिव वाचवुन तिथुन पळुन जात असता आरोपीने त्यांना जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 307,504,506 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला ताब्यात घेण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री. तेजराम मेश्राम मो.न 9075245059 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर